"जनहिताय सर्वदा"

# महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दूरध्वनी क्र : ०२२-२२८१-०३८६ Email: labour7.ield-mh@nic.in

क्रमांक : इबांका-२०२३/प्र.क्र.७७/कामगार-७ दिनांक: २१ फेब्रुवारी, २०२४

प्रति,

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र इमारत व इतर कामगार कल्याणकारी मंडळ,
एमएमटीसी बिल्डींग, ई-ब्लॉक, सी- २२,वांद्रे-कुर्ला संकुल,
वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०००५१.

**विषय:-** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता **तपासणी ते उपचार आरोग्य योजना** (Test to Treat) योजनेअंतर्गत चाचण्या निश्चित करुन मिळणेबाबत.

**संदर्भ:-** (१) शासन निर्णय क्र. इबांका-२०२३/ प्र. क. ७७/ काम-७, दि.०७.०८.२०२३.

(२) शासन शुध्दिपत्रक क्र. इबांका-२०२३/ प्र. क.७७/ काम-७, दि.०९.०१.२०२३.

(३) सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र. आरोग्य-२०२३/प्र.क्र.०९/ योजना-०६/२७२२/२०२४, दिनांक ०१.०२.२०२४

महोदय,

विषयाधीन प्रकरणी संदर्भाधीन पत्रान्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता राबविण्यात येणाऱ्या "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" (Test to Treat) या योजनेची एकंदर रुपरेषा, योजनेच्या अटी व शर्ती याबाबत संदर्भाधीन क्र.०१ येथील नमूद शासन निर्णयाच्या अनुषंगाने मंडळाने सदर योजनेचे "विश्वकर्मा बांधकाम कामगार आरोग्य सेवा" असे नामकरण, सदर योजनेअंतर्गत चाचण्या निश्चित करण्याबाबत तसेच इतर अनुषंगिक बाबींस मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे.

२. प्रस्तुत प्रकरणी मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" या योजनेसंदर्भातील मंडळाने शासनास सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने आपणांस खालीलप्रमाणे कळविण्याबाबत मला शासनाचे निर्देश आहेत:-

अ) मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांकरीता मंडळामार्फत राबविण्यात येणारी "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" प्रामुख्याने तीन टप्प्यात राबविण्यात येणार असून त्यातील प्रथम टप्प्यातील प्राथमिक आरोग्य तपासणीबाबत यापूर्वीच आरोग्य तपासणी संदर्भात २३ चाचण्यांना मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. उक्त योजनेतील प्राथमिक आरोग्य तपासणीच्या टप्प्याकरीता देखील त्याच चाचण्या कायम ठेवण्याबाबत मंडळाने प्रस्तावित केल्याप्रमाणे शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

ब) दिनांक ०७ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद (४) ब-४ नुसार "प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचण्या (Advanced Confirmatory Test)" या केवळ जिवितास धोका निर्माण करणाऱ्या आजारांच्या बाबतीत करावयाच्या आहेत. त्यास अनुसरुन उक्त योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातील प्रगत पुष्ठीकरण २३४ चाचण्यांपैकी Arthritis बाबतच्या ५१, Eye बाबतच्या २१ व Ear बाबतच्या ४ चाचण्या अशा एकूण ७६ चाचण्या वगळून (२३४-७६=१५८) उर्वरीत एकूण १५८ चाचण्यास मंडळाने प्रस्तावित केल्याप्रमाणे शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

क) मंडळामार्फत बांधकाम कामगारांकरीता राबविण्यात येणाऱ्या "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" या योजनेतील तिसरा टप्पा "वैद्यकीय उपचार" यातील मंडळाने प्रस्तावित केलेल्या रुग्णालय भरती बाबतच्या १८६१ बाबी व औषधोपचार याबाबतच्या १६१७ बाबींच्या अनुषंगाने Central Government Health Scheme (CGHS) द्वारें निश्चित केलेल्या दरानुसारच करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

ड) बांधकाम कामगारांकरीता राबविण्यात येणाऱ्या "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" या योजनेतील प्राथमिक आरोग्य तपासणी, प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी आणि वैद्यकीय उपचार या मुख्य बाबींकरीता उपरोक्त नमूद केलेल्या प्राथमिक आरोग्य तपासणी चाचण्या, प्रगत पुष्ठीकरण आरोग्य तपासणी चाचण्या, रुग्णालय भरती व औषधोपचार यांसाठीच्या बाबींमध्ये यापुढील कालावधीत बदल करावयाच्या झाल्यास दिनांक ०७.०८.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या "बांधकाम कामगार आरोग्य समिती" च्या शिफारशीने शासनास प्रस्ताव सादर करण्यात यावा.

इ) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने दिनांक ०१.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावातील परिच्छेद ४ मधील (च) आणि (छ) मध्ये प्रस्तावित केलेल्या बाबींच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, दिनांक ०७.०८.२०२३ रोजीचा शासन निर्णय व दिनांक ०९.०१.२०२४ रोजीच्या शासन शुद्धीपत्रकान्वये मंडळांतर्गत बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या "तपासणी ते उपचार" (Test to Treat) या योजनेची एकंदर रुपरेषा, योजनेच्या अटी व शर्ती प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार मंडळाने विहित कार्यवाही करावी.

फ) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता राबविण्यात येणाऱ्या तपासणी ते उपचार (Test to Treat) योजनेचे "विश्वकर्मा बांधकाम कामगार आरोग्य सेवा" असे नामकरण करण्याबाबतच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने यथावकाश आपणास कळविण्यात येईल.

ज) मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांकरीता तपासणी ते उपचार आरोग्य योजना (Test to Treat) राबविण्याकरीता नियुक्त करण्यात आलेल्या मे.एच.एल.एल.लाईफकेअर लिमिटेड (भारत सरकार उद्योग) या संस्थेसोबत करावयाच्या मंडळाने सादर केलेले करारनाम्याचे प्रारुप दिनांक ०७.०८.२०२३ रोजीचा शासन निर्णय आणि दिनांक ०९.०१.२०२४ रोजीच्या शुद्धीपत्रकातील तरतूदी विचारात घेवून करारनामा मंडळ स्तरावर अंतिम करण्यात यावा.

३. उपरोक्त नमूद बाबींच्या अनुषंगाने मंडळ स्तरावर पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

आपला,

( दा.सो.खताळ )

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत:- निवडनस्ती (कामगार-७)